आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ जून २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरात अर्धा टक्के कपात, शेअर बाजारात जोरदार तेजी

- काश्मिर ते कन्याकुमारी रेल्वेमार्गानं जोडणाऱ्या उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे प्रकल्पाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण

- तहव्वुर राणाच्या न्यायालयीन कोठडीत ९ जुलैपर्यंत वाढ

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महिना अखेरीला कॅनडामध्ये होणाऱ्या जी-सेव्हन शिखर परिषदेला उपस्थित राहणार

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेनं आज द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केला. पतधोरण समितीनं रेपो दरात अर्धा टक्के कपात केली आहे. आता रेपो दर साडेपाच टक्के झाला आहे. फेब्रुवारीपासून सलग तिसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं व्याजदरात कपात केली असून या कालावधीत रेपो दर एकूण १ टक्क्यानं कमी झाला आहे.

चालू आर्थिक वर्षात चलनफुगवट्याचा दर ३ पूर्णांक ७ दशांश टक्के पर्यंत आटोक्यात राहील असा सुधारित अंदाज पत धोरण समितीनं आढाव्यात व्यक्त केला आहे. या आधी हा दर ४ टक्के राहील असा अंदाज होता. चालू आर्थिक वर्षासाठी देशाचा आर्थिक वृद्धी दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे.

सोन्याचे दागिने गहाण ठेवून अडीच लाख रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्यांना आता ७५ ऐवजी ८५ टक्के इतक्या रकमेचं कर्ज मिळेल, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं. देशात परकीय चलनाचा पुरेसा साठा असल्याचंही त्यांनी आज स्पष्ट केलं.
व्याजदर कपातीच्या निर्णयाचं उद्योजकांच्या संघटनांनी स्वागत केलं आहे.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या व्याजदर कपातीचा जोरदार परिणाम आज शेअर बाजारात दिसून आला. सेन्सेक्स ७४७ अंकांनी वधारुन ८२ हजार १८९ अंकांवर बंद झाला. निफ्टी २५२ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ३ अंकांवर स्थिरावला. बँका आणि स्थावर मालमत्ता क्षेत्रातले समभाग आज तेजीत होते.

**<><><><>**

देश आता काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत रेल्वे मार्गाने जोडला गेला असून चिनाब आणि अंजी हे पूल जम्मू-काश्मीरसाठी समृद्धीचं प्रवेशद्वार होतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. ते आज जम्मू आणि कश्मीरमध्ये ४६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध पायाभूत प्रकल्पांच्या उद्घाटनावेळी बोलत होते. यावेळी त्यांनी उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे प्रकल्पाचं राष्ट्रार्पणही केलं. या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आणि जगातला सर्वात उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचं उद्घाटन केलं. तसंच, देशातला सर्वात उंचावरचा केबलवरचा पूल असलेल्या अंजी पुलाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. जम्मू काश्मीरमधे सुरू होणारे विकास प्रकल्प राज्याच्या विकासाला नवीन गती देतील, असंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

या कार्यक्रमात त्यांनी रेल्वे प्रकल्पात आणि चिनाब पूल निर्मितीत सहभागी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. काश्मीरच्या भूमीवर झालेल्या पहलगाम हल्ल्याविषयी बोलताना प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड.. बाईट - नरेंद्र मोदी**

तत्पूर्वी, प्रधानमंत्र्यांनी कटरा इथं श्री माता वैष्णोदेवी-श्रीनगर वंदे भारत गाडीला हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर त्यांनी शालेय विद्यार्थ्यांबरोबर गाडीने प्रवास केला.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली असून या काळात सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी सरकारनं विविध पावलं उचलली आहेत. ऐकूया एक आढावा…

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ जून २०२५ - शुक्रवार

**होल्ड - व्हाइस कास्ट**

गेल्या दशकात भारताचा समृद्ध वारसा आणि वैविध्यपूर्ण संस्कृतीचं पुनरुज्जीवन झालं आहे. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षाच्या निमित्त आयोजित आझादी का अमृत महोत्सवासारख्या मोहिमेअंतर्गत देशभरात सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित झाले. भारताच्या स्वातंत्र्यसेनानींचा सन्मान करण्यासाठी, त्यांचा वारसा जपण्यासाठी सरकारनं प्रयत्न केले.  प्रधानमंत्री संग्रहालय, राष्ट्रीय पोलिस स्मारक, आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालयं, भारत मंडपम आणि नवीन संसद इमारत यांचं लोकार्पण झालं. एक भारत, श्रेष्ठ भारत उपक्रम, काशी तमिळ संगमम आणि महाकुंभ यामध्ये ६६ कोटींहून अधिक जण सहभागी झाले. तसंच बौद्ध शिखर परिषद आणि शीख गुरुंच्या प्रकाश पर्व यासारख्या कार्यक्रमांनी भारताच्या आध्यात्मिक वारशाला बळकटी दिली. गेल्या दशकात योग ही एक जागतिक चळवळ बनली आहे. आयुष व्हिसा, जागतिक आरोग्य संस्थेशी भागीदारी यामुळे आयुर्वेदाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे. गेल्या दहा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत भारताचं स्थान वाढलं असून भारतात ४३ जागतिक वारसा स्थळं आहेत. याशिवाय, वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट सारखे कार्यक्रम जागतिक व्यासपीठावर भारताच्या माध्यम आणि मनोरंजन प्रतिभेचे प्रदर्शन करत आहेत. भारतीय सण-उत्सव, योग, संगीत आणि कलेला अनेक देशांमध्ये सन्मान मिळतो आहे.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्लीत भारतीय भाषा विभागाचं उद्घाटन केलं. विदेशी भाषांच्या प्रभावापासून प्रशासनाला मुक्त करण्याच्या दिशेनं हे एक पाऊल असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरेन रिजिजू यांनी आज नवी दिल्लीत उमीदच्या केंद्रीय पोर्टलचं अनावरण केलं. वक्फ मालमत्ता व्यवस्थापन आणि प्रशासनात उमीद सेंट्रल पोर्टलमुळे पारदर्शकता येईल असं रिजिजू यांनी म्हटलं आहे. नवीन वक्फ मालमत्तेची नोंदणी, वक्फ तपशील दाखल करणं, औकाफच्या रजिस्टरची देखभाल, यासह विविध कामासांठी या पोर्टलची निर्मिती केली आहे. तसंच वक्फ आणि संबंधित मालमत्तेची नोंदणी

करण्यासाठी एकल-चरण प्रक्रिया, ओटीपी पडताळणीद्वारे लॉगिन ही या पोर्टलची वैशिष्ट्य आहेत. यामुळे डेटा अखंडता राहील आणि अनधिकृत नोंदी रोखण्यास मदत मिळेल.

<><><>

दिल्ली न्यायालयानं २६/११ मुंबई हल्ल्यातला आरोपी तहव्वुर हुसैन राणा याच्या न्यायालयीन कोठडीची मुदत पुढील महिन्याच्या ९ तारखेपर्यंत वाढवली आहे. राणाच्या वकिलाने त्याच्या आरोग्याच्या स्थितीबाबत चिंता व्यक्त केल्यावर पटियाला हाऊस कोर्टानं तिहार जेल अधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्यास सांगितलं आहे.

<><><>

सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय परीक्षा मंडळाला ३ ऑगस्ट रोजी एकाच सत्रात नीट पीजी प्रवेश परीक्षा घेण्याची परवानगी दिली आहे. याआधी ही परीक्षा १५ जूनला होणार होती.

<><><>

महापूर तसंच भूस्खलनाच्या दुर्घटनांमुळं सिक्कीमच्या मंगन जिल्ह्यातल्या लाचेन इथं अडकलेल्या सर्व पर्यटकांची आज सुखरूप सुटका करण्यात आली. भारतीय वायुसेनेनं हे बचाव कार्य राबवलं. हे सर्व पर्यटक स्वगृही रवाना झाले असल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या महिन्याच्या अखेरीस कॅनडामध्ये होणाऱ्या जी- सेव्हन शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. जी- सेव्हन शिखर परिषदेसाठी कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांनी आमंत्रित केल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांनी त्यांचे आभार मानले आहेत. तसंच कार्नी यांना निवडणुकीत मिळालेल्या विजयाबद्दल त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये त्यांचं अभिनंदन केलं आहे. भारत आणि कॅनडामध्ये परस्पर आदर आणि हितसंबंधं असून दोन्ही देश नव्या जोमाने एकत्र काम करतील असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><>

रशियन हवाई संरक्षण यंत्रणेने यूक्रेनचे १७४ ड्रोन अडवून ते नष्ट केले आहेत. मॉस्को, क्रिमिया यासह अनेक ठिकाणांच्या दिशेने हे ड्रोन येत असल्याची माहिती रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने दिली आहे. तसंच, काळ्या समुद्रावरून येणारी यूक्रेनची क्षेपणास्त्रंही रशियाने नष्ट केली आहेत. या दुर्घटनांमध्ये तीन जण जखमी झाले आहेत.

**<><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या, हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश घेण्यापासून परदेशी विद्यार्थ्यांना थांबवण्याच्या आदेशाला अमेरिकेतल्या बोस्टन इथल्या न्यायालयानं आज तात्पुरती स्थगिती दिली. ट्रम्प यांचा हा निर्णय बेकायदा असल्याचं सांगून या निर्णयाविरोधात हार्वर्ड विद्यापीठानं न्यायालयात धाव घेतली होती.

**//<><><><>//**